# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 02.04.2025** **वार-बुधवार**

---

**वक्फ (सुधारणा) विधेयक**

संयुक्त संसदीय समितीने दिलेल्या अहवालानुसार, वक्फ (सुधारणा) विधेयक, 2025 वर लोकसभेत आज चर्चेला सुरुवात झाली. केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी हे विधेयक मांडताना सांगितलं की, मुस्लिमांच्या धार्मिक प्रथेशी त्याचा काहीही संबंध नाही आणि ते केवळ वक्फ बोर्डांशी संबंधित मालमत्तेशी संबंधित आहे. सरकार वक्फ बोर्डांना सर्वसमावेशक आणि धर्मनिरपेक्ष बनवू इच्छिते असं सांगून ते म्हणाले की हा कायदा मशिदीच्या व्यवस्थापनासाठी नाही आणि कोणाचीही मालमत्ता जप्त करण्याचा त्यात हेतू नाही.

रिजीजू म्हणाले की, या विधेयकानुसार, वक्फ बोर्डांमध्ये विविध मुस्लिम पंथ, महिला आणि गैर-मुस्लिम आणि इतरांचं प्रतिनिधित्व असेल. विरोधक विधेयकावरून लोकांची दिशाभूल केल्याचा त्यांनी आरोप केला. ते म्हणाले की, सध्याच्या कायद्यात, देशातील कोणत्याही जमिनीला वक्फ मालमत्ता म्हणून घोषित करण्यासाठी काही तरतुदींचा गैरवापर करण्यात आला आहे. काँग्रेसच्या काळात राष्ट्रीय राजधानीतील एकंदर 123 मालमत्ता दिल्ली वक्फ बोर्डाकडे हस्तांतरित करण्यात आल्याचं त्यांनी नमूद केलं. जगात भारतात सर्वाधिक वक्फ मालमत्ता आहेत, मग भारतीय मुस्लिम अजूनही गरीब का आहेत असा प्रश्न रिजीजू यांनी उपस्थित केला.

विरोधकांना उत्तर देताना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा म्हणाले की, मंत्रिमंडळानं मंजूर केलेल्या संयुक्त संसदीय समितीने सविस्तर चर्चा केल्यानंतर हे विधेयक आणलं आहे.

चर्चेला सुरुवात करताना, काँग्रेसचे गौरव गोगोई यांनी सरकारवर या विधेयकावर लोकांची दिशाभूल करण्याचा आरोप केला. ते म्हणाले की, हे विधेयक संविधानाविरुद्ध आहे. या कायद्यातील सुधारणांमुळे अधिक समस्या निर्माण होतील अशी टिका त्यांनी केली.

समाजवादी पक्षाचे अखिलेश यादव यांनी महागाई, बेरोजगारी, आणि इतर मुद्द्यांशी संबंधित अपयश लपविण्यासाठी सरकारनं हे विधेयक आणलं आहे अशी टिका केली.

तृणमूल काँग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी यांनी प्रस्तावित कायदा चुकीचा, तर्कहीन आणि मनमानी असल्याचं म्हटलं. मुस्लिम समुदायाच्या अधिकारांवर अंकुश लावण्याचा हा प्रयत्न असल्याचा आरोप त्यांनी केला.

**फळ झाडं**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून गेल्या आर्थिक वर्षामध्ये 44 हजार 904 हेक्टर क्षेत्रावर फळझाडांची लागवड पूर्ण झाली आहे. मागील पाच वर्षांतील ही उच्चांकी लागवड करण्यात आली. मनरेगातून फळझाडं लागवडीच्या नियोजनात शेतकऱ्यांसह क्षेत्रीय स्तरावरील सर्व कृषी कर्मचारी, अधिकाऱ्यांचा मोलाचा वाटा राहिला. त्यामुळेच फळझाडांसह मसाला पिके, फुले आदींची उच्चांकी लागवड पूर्ण होऊ शकली आहे असं कृषी आयुक्तालयाचे फलोत्पादन संचालक डॉक्टर कैलाश मोते यांनी सांगितलं.

**उत्पन्न**

पुणे महापालिकेला प्रथमच 2024-25 या आथिक वर्षात 8 हजार 272 कोटी रुपये विक्रमी उत्पन्न मिळालं आहे. पुणे महापालिकेचं या आर्थिक वर्षाचं 11 हजार 601 कोटींचं अंदाजपत्रक होतं.

**फॅशन**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या समाज विकास विभागाच्या वतीनं भोसरी इथल्या शिलाई केंद्रामध्ये महिलांसाठी मोफत फॅशन डिझायनिंग प्रशिक्षण सुरू करण्यात आलं आहे. नुकत्याच दहावी आणि बारावीची परीक्षा दिलेल्या विद्यार्थिनींसह विविध वयोगटातील महिलांचा या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

**कंत्राटी**

पुणे महापालिकेत काम करणाऱ्या कंत्राटी कामगारांना महापालिकेच्या सेवेत घ्यावं अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे पुणे शहराध्यक्ष दीपक मानकर यांनी महापालिका आयुक्त डॉक्टर राजेंद्र भोसले यांच्याकडं केली आहे. या सेवकांवर मोठा आर्थिक ताण येत असून त्याचा परिणाम अतिक्रमण विभागाच्या कामकाजावर होत असल्याचं मानकर यांनी म्हटलं आहे.

**यशदा प्रशिक्षण**

शासकीय अधिकाऱ्यांकडे काम घेऊन येणाऱ्यांसाठी त्या अधिकाऱ्यांनी उपलब्ध असलं पाहिजे. लोकांमध्ये जाऊन त्यांच्या समस्या जाणून घेऊन, त्यांच्या सूचना विचारात घेऊन त्या पद्धतीने कामकाज करायला हवं. त्याचबरोबर अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यालयाचं दार सामान्यांसाठी सतत उघडं ठेवावं, असं आवाहन यशदाचे महासंचालक निरंजनकुमार सुधांशू यांनी केलं. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून नियुक्त झालेल्या राज्यसेवेतील वर्ग 1 च्या 144 अधिकाऱ्यांच्या, 10 व्या एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम तुकडीचं पायाभूत प्रशिक्षण आजपासून यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी यशदामध्ये सुरु झाले. या प्रशिक्षणाच्या उद्घाटनप्रसंगी सुधांशू बोलत होते.

**पुरस्कारक**

संत विचार प्रबोधिनी, पुणे आयोजित डॉ. रामचंद्र देखणे स्मृती पुरस्कार प्रदान सोहळा रविवार 13 एप्रिलला आयोजित करण्यात आला आहे. यावेळी कीर्तन सेवा पुरस्कार ज्येष्ठ कीर्तनकार ह. भ. प. डॉक्टर जयवंत महाराज बोधले यांना तर लोककला सेवा पुरस्कार लोकसाहित्याचे गाढे अभ्यासक डॉक्टर प्रकाश खांडगे यांना प्रदान केला जाणार आहे. पुरस्काराचं यंदाचं तिसरं वर्ष आहे.

**हवमान**

पुणे आणि परिसरात आज गडगडाटी पावसाचा अंदाज होता. परंतु दिवसभरात उन्हासह आकाश निरभ्र राहिलं.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**